महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

कार्यकारी अभियंता
५०० एम.डब्लु.नवीन पावर हाऊस,
४०० केव्हीआर एस विभाग
एमएसईटीसीएल ,खापरखेडा
Email Id-ee4170@mahatransco.in

४००/केव्ही/आर.एस/.मांस/विभाग/खापरखेडा/535 दिनांक:- 25/6/2024

## जाहीर सुचना

औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद ( NCVT ) उत्तीर्ण उमेदवारांना सुचित करण्यात येते कि, ४०० केव्ही.ग्रहण आर.एस.विभाग खापरखेडा, महाराष्ट्र राज्य विदयुत पारेषण कंपनी मर्यादित, नागपुर वर्ष २०२४-२०२५ करीता शिकाऊ उमेदवारांना एक वर्ष कालावधीसाठी करारबध्द करण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी www.apprenticeship.gov.in या संकेत स्थळावर शिकाऊ उमेदवारी करीता दि. २७.०६.२०२४ ते ०३.०७.२०२४ पर्यंत २४:०० वाजेपर्यंत खालील नमुद आस्थापना नोंदणी कमांकवर ऑनलाईन अर्ज सादर करावे. आस्थापना नोंदणी कमांक व शिकाऊ उमेदवारी पदांचा तपशिल खालील प्रमाणे आहेत.

| अनु क. | कार्यालयाचे नाव | रजिस्ट्रेशन कमांक | विजतंत्री (ELECTRICAN) |
|---|---|---|---|
| १ | ४०० केव्ही.ग्रहण आर.एस. विभाग खापरखेडा | E05202701894 | ०६ |

१. शैक्षणिक अर्हता

१ महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा उर्तीर्ण

२ राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) नवी दिल्ली मान्यता प्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात परिक्षा उत्तीर्ण

२. शैक्षणिक दस्तावेज/कागदपत्रे (लागु असल्यामुळे)

१.एस.एस.सी व आय.टी. आय. विजतंत्री चार सेमिस्टरचे उतीर्ण गुणपत्रिकाची मुळ प्रत.

२.शाळा सोडल्याचा दाखला

३.आधार कार्ड

४.मागासवर्गीय असल्याचे जात प्रमाणपत्र

५.महाराष्ट्र राज्याचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र

६.प्रगत व उन्नत गटात मोडत नसल्याचे-नॉन किमिलेअर प्रमाणपत्र(अजा, व अज या प्रवर्गातील उमेदवार वगळुन)

७.आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS) असल्याबाबतचे प्रमाणपत्र व इतर सर्व अनुषांगिक आवश्यक कागदपत्राची मुळ प्रत उमेदवाराने स्वतःच्या प्रोफाईलवर स्कॅन करून उपलोड करावे.

३. विदयावेतनः-प्रचलित नियमाप्रमाणे लागु राहील.

४. नमुद पदसंख्या कमी-अधिक करण्याचे व भरती प्रकियेशी निगडीत असलेले निर्णय घेण्याचे सर्व अधिकार व्यवस्थापन राखुन ठेवित आहे व सदरचा निर्णय कोणत्याही प्रकारे उमेदवारास कळविला जाणार नाही.

५. भरती प्रकियेदरम्यान उमेदवाराने राजकीय किंवा इतर अधिका-याकडुन दवाब आणल्यास त्या उमेदवारास भरती प्रकियेतुन बाहेर करण्यात येईल.

६. उमेदवारांनी ऑनलाईन (Online) अर्ज करतांना पोर्टलवर आवश्यक मुळ प्रमाणपत्र स्कॅन करून योग्य रितीने अपलोड करणे बंधनकारक आहे. वरिल कालावधीत ऑनलाईन(Online)अर्ज सादर न केल्यास त्या नंतरच्या कालावधीत आलेला अर्जाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी

७. वयोमर्यादा १८ ते ३३ वर्ष (मागासवर्गीयांसाठी ०५ वर्ष शिथिलक्षम) .

८. एस.एस.सी व आय.टी. आय. विजतंत्री गुणपत्रीकेवरील नाव आधारकार्ड मधील नावाशी सुसंगत असणे आवश्यक आहे, अन्यथा आपला अर्ज स्विकारला जानार नाही.

९. ऑनलाईन ( Online ) अर्ज सादर करतांना उमेदवाराने सधस्थितीत कार्यान्वीत ई-मेल आय.डी ( Email id) व भ्रमणध्वनी कमांक नोंदविणे आवश्यक राहील.

१०. अपुर्ण चुकीचे व अपु-या कागदपत्रासह सादर केलेले ऑनलाईन अर्ज स्विकारल्या जाणार नाही. अथवा त्याचा विचार केल्या जाणार नाही. तसेच अर्जामध्ये नमुद केलेली माहीती खोटी आढळुन आल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरेल.

११. शिकाऊ उमेदवारांची निवड ही एस.एस.सी व आय.टी. आय गुणांचा टक्केवारीनुसार तसेच सामाजिक आरक्षणाच्या अधिन राहुन प्रवर्गनिहाय केली जाईल.

१२. आरक्षणाचा लाभ घेणा-या उमेदवारास या कार्यालयाने वेळोवेळी शासनाच्या नियमाप्रमाणे आरक्षणा सबंधीत कागदपत्राची मागणी केल्यास ते सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

१३. प्रणाली मध्ये बदल होत असल्यामुळे याआधी ज्या उमेदवारांनी वरिल रजिस्ट्रेशन कमांकावर (Online )अर्ज सादर केले असेल त्यांनी पुन्हा अर्ज सादर करणे आवश्यक आहे याची नोंद घ्यावी. सदर भरती प्रकियेंकरीता

फक्त दिनांक २७.०६.२०२४ ते ०३.०७.२०२४ दरम्यान ऑनलाईन (Online) अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचा विचार केला जाईल. वर नमुद दिनांकाच्या पुर्वी किंवा नंतर ऑनलाईल अर्ज सादर केलेल्या उमेदवारांचा भरती प्रकियेकरीता विचार केला जाणार नाही याची सुध्दा नोंद घ्यावी.

१४. ऑनलाईन अर्ज सादर केल्यानंतर या जाहीरातीसह जोडलेला प्रपत्र अ परीपुर्ण भरुन त्यासह ऑनलाइन सादर केलेल्या अर्जाची प्रत व मुद्दा क. ०२ मध्ये नमुद आवश्यक कागदपत्रे/प्रमाणपत्रांच्या सांक्षांकीत/स्वसाक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती व इतर कागदपत्रे दि.०७.०७.२०२४ सायं.०६.०० वाजे पर्यंत कार्यकारी अभियंता ४०० केव्ही.ग्रहण आर.एस.विभाग,७०० एम. डब्लु.नविन पावर हाउस, मुख्य अभियंता यांच्या बंगल्याजवळ खापरखेडा,-४४११०२ या पत्त्यावर पोस्टाव्दारे किंवा स्वहस्ते पोहचेल या बेताने पाठवावे. तसेच सदर प्रपत्र आवश्यक कागदपत्र/प्रमाणपत्रांसह विहीत मुदतीत प्राप्त न झाल्यास आपला अर्ज भरती/निवड प्रकीयेसाठी विचारात घेतला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सहपत्रः- प्रपत्र अ

कार्यकारी अभियंता
४०० केव्ही.ग्रहण आर.एस.विभाग
खापरखेडा

# प्रपत्र-अ

म.रा.वि.पारेषण कंपनी मर्यादित या कंपनीच्या कार्यकारी अभियंता ४०० केव्ही.आर.एस.विभाग खापरखेडा या कार्यालयाने दिलेल्या जाहिरातीस अनुसरून कारावयाचा अर्ज

उमेदवाराने अलिकडे काढलेला पारापोर्ट साईजचा फोटो येथे चिटकवावा व त्यावर स्वाक्षरी करावी ( स्टेपल किंवा पिन लावु नये )

| | | |
|---|---|---|
| १ | उमेदवाराचे पुर्ण नाव | ........................................................................<br>(आडनाव) (उमेदवाराचे नाव) (वडिलांचे/पतीचे नाव) |
| २ | उमेदवाराचे वडिलांचे नाव | ........................................................................<br>(आडनाव) (उमेदवाराचे नाव) (आजोबांचे नाव) |
| ३ | लिंगव वैवाहिक स्थिती | ............ .............. ........... ................<br>स्त्री पुरूषविवाहीत अविवाहित<br>(Female) ( Male) ( Married) ( Unmarried) |
| ४ | उमेदवाराचा पत्रव्यवहाराचा पत्ता | ........................................................................<br>........................................................................<br>........................................................................<br>पिन कोड |
| ५ | उमेदवाराचा कायमचा पत्ता | ........................................................................<br>........................................................................<br>........................................................................<br>पिन कोड |
| ६ | दुरध्वनी/ मोबाईल क. | ......................... .....................<br>कोड दुरध्वनी क. मोबाईल कमांक |
| ७ | ई-मेलआय. डी. | |
| ८ | जन्म दिनांक | दिनांक महिना वर्ष |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | जातीचा प्रवर्ग ( लागू असलेल्या ठिकाणी ( ) अशी खुण करावी | अनु जाती SC | अनु जमाती ST | विजा (अ) VJA | भज (ब) NTB | भज (क) NTC | भज (ड) NTD | विमा प्र SBC | इमाव OBC | ईडब्लु एस EWS | खुला Open |

| | | |
|---|---|---|
| १० | अ)महाराष्ट्र शासनाने प्रधिकृत केलेल्या समक्ष प्राधिका-यांचा जातीचा दाखला जोडला आहे काय? | होय<br>नाही |
| | ब)महाराष्ट्रशासनाने प्रधिकृत केलेल्या समक्ष | होय |

| | | |
|---|---|---|
| | जात पडताळणी समितीने वैध केलेले जाती वैधता प्रमाणपत्र जोडले आहे का ? | नाही |
| | अ)उन्नत/प्रगत गटात मोडत नसल्याचे प्रमाणपत्र (Non Creamy Layer )जोडले आहे का? (SC/STसोडुन) | होय<br>नाही |
| ११ | १) उमेदवार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी आहे काय<br><br>२) महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्रधिकृत केलेल्या समक्ष अधिका-याचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile) जोडलेआहेका? होय<br>नाही | होय<br>नाही |
| १२ | शैक्षणिक पात्रता : प्रमाणपत्राच्या प्रती जोडव्यात | |

| अनुक्र | परिक्षेचे नाव | शाळा/मंडळ /विद्यापीठ/ संस्थेचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | मिळालेले एकुण गुण | मिळालेली टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | एस.एस.सी (१० वी ) | | | | | |
| २ | औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतुन विजतंत्री या व्यवसायात राष्टीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद ( NCVT ) उत्तीण झाल्याचे प्रमाणपत्र | | | | | |

## <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी असे प्रमाणित करतो/करते कि, म.रा.वि.पा.क.मर्यादित या कंपनीच्या कार्यकारी अभियंता ४०० केव्ही.आर.एस.विभाग खापरखेडा यांच्या कार्यालयाने प्रस्तृत दिलेली जाहिरात मी काळजीपुर्वक वाचली असुन ती मला समजली आहे. सदर जाहिरातीत नमुद केलेल्या अटी व शर्ती मला मान्य आहे. तसेच वरील अर्जात दिलेली माहिती खरी, सपुर्ण असुन ती चुकीची व खोटी आढळुन आल्यास माझी उमेदवारी रदद होईल याची व मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील, याबाबत मला, पुर्णपणे जाणीव आहे. तसेच, मी सादर केलेली कोणतीही माहिती निवड प्रकीयेच्या कोणत्याही टप्प्यावर खोटी अथवा बनावट आढळुन आल्यास मला निवड प्रकियेतुन बाद करण्यात येईल.

१. मी असेही प्रमाणित करतो/करते कि, माझी निवड झाल्यास मी कंपनीच्या कार्यक्षेत्रात कोणत्याही ठिकाणी रूजु होण्यास तयार आहे.
२. मी असे प्रमाणित करतो/करते कि, जाहिरातीत विहित केलेल्या अटी व शर्ती व निवड प्रकिया मला मान्य राहतील.

स्थळः-

ठिकाणः- उमेदवाराची स्वाक्षरी